# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : **diplomadesk10dte@gmail.com** Internet : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/2016-17/प्र.वाढ/291
दिनांक : 2 MAR 2016

**अधिसूचना**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2016-17 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ऑन लाईन पध्दतीने पदविका अभ्यासक्रमांच्या ज्या अभ्यासक्रमांना **एनबीए (National Board of Accreditation, New Delhi)** कडून ॲक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे अशा पदविका अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थांनी संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. सदर कालावधी दिनांक 2.3.2016 पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. तसेच विलंब शुल्कासह प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक 5.3.2016 पर्यंत वाढविण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, संबंधीत संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे अर्ज सादर केल्यानंतर तात्काळ या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लिंक वर माहिती भरावी. सदर माहिती भरण्याचा अंतिम दिनांक 5.3.2016 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

ज्या संस्थामार्फत संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने दिनांक 5.3.2016 पर्यंत माहिती भरण्यात येईल अशा संस्थांनाच सुनावणीकरीता बोलविण्यात येवून त्यानुसार या संचालनालयाच्या अभिप्रायांसह शासनामार्फत परिषदेस अभिप्राय/ शिफारस सादर करण्यात येणार आहे. सुनावणी बाबतचे वेळापत्रक वेळोवळी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई